दस्तावेज क्र. ५१

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority

क्रमाक : मजनिप्रा/२०१८/विधिविषयक याचिका/प्रकरण क्र १३ (२०१८)/७३३

दि.१७/१०/२०१८

स्वाधिकारे याचिका– १३५ लीटर प्र. व्य./प्र. दि. या प्रमाणे निलवंडे प्रकल्पातून एकत्रित रित्या श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, शिरडी पंचायत व कोपरगाव शहरासाठी पाण्याचे आरक्षण देण्याकरिता आरक्षणाचे प्रमाण शिथिल करण्याविषयी. प्रकरण क्र. १३/२०१८

या सोबत दि. १७/१०/२०१८ चा मजनिप्रा आदेश क्र. १५/२०१८

सहपत्र – वरीलप्रमाणे

स्वाक्षरित
(डॉ. सुरेश कुळकर्णी)
सचिव

प्रति:– माहितीसाठी तथा आवश्यक कार्यवाहीसाठी :–

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, ता. राहाता, जि. अहमदनगर, ४२३१०९ ............... याचिकाकर्ता

२) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा), एक्सप्रेस टावर्स, चवथा माळा, नरिमन पॉइंट, मुंबई, ४०००२१ .................... प्रतिवादी क्र. १

३) कार्यकारी संचालक, गोदावरी –मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, पहिला माळा, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद, ४३१००५ ................ प्रतिवादी क्र. २

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

४)	मुख्य अधिकारी, शिरडी नगर पंचायत, शिरडी ता. राहता, जि. अहमदनगर, ४२३१०९

.........प्रतिवादी क्र. ३

५)	मुख्य अधिकारी, कोपरगाव न. पालिका, कोपरगाव जि. अहमदनगर, ४२३६०१

......... प्रतिवादी क्र. ४

६)	श्री. ज्ञानदेव घोरपडे, माजी सरपंच, ग्रामपंचायत पिंप्री निर्मल ता. रहाता, जि. अहमदनगर, मार्फत अॅड. सिध्दार्थ करपे, सी–११, कॉस्मॉस ट्रेड सेंटर, खटाव बिल्डींग, बीएसई जवळ, फोर्ट, मुंबई, ४००००१

दस्तावेज क्र. ५१

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
Maharashtra Water Resources Regulatory Authority

आदेश क्रमांक:– १५/२०१८

स्वाधिकारे याचिका– १३५ लीटर प्र. व्य./प्र. दि. या प्रमाणे निलवंडे प्रकल्पातून एकत्रित रित्या श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, शिरडी पंचायत व कोपरगाव शहरासाठी पाण्याचे आरक्षण देण्याकरिता आरक्षणाचे प्रमाण शिथिल करण्याविषयी. प्रकरण क्र. १३/२०१८

श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, ता. राहाता, जि. अहमदनगर, ४२३१०९ मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी ............... याचिकाकर्ता

**विरुध्द**

१) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा), एक्सप्रेस टावर्स, चवथा माळा, नरिमन पॉइंट, मुंबई, ४०००२१ ........ प्रतिवादी क्र. १

२) कार्यकारी संचालक, गोदावरी –मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, पहिला माळा, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद, ४३१००५ ....... प्रतिवादी क्र. २

३) मुख्य अधिकारी, शिरडी नगर पंचायत, शिरडी ता. राहता, जि. अहमदनगर, ४२३१०९ .........प्रतिवादी क्र. ३

४) मुख्य अधिकारी, कोपरगाव न. पालिका, कोपरगाव जि.अहमदनगर,४२३६०१ ....... प्रतिवादी क्र. ४

कोरम:—

श्री. विनोद जे. तिवारी, अध्यक्षीय सदस्य, (विधि)

श्री. व्ही. एम. कुळकर्णी, सदस्य, (ज.सं. अभियांत्रिकी)

श्री. एस. टी. सांगळे, सदस्य (इकॉनॉमीक्स)

दि. १७/१०/२०१८

## पार्श्वभूमि

१. याचिकाकर्ते— श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्या मार्फत, त्याच्या दि. ०३/०९/२०१८ च्या प्रतिवेदनानुसार या प्राधिकरणाला विनंती केली आहे की, पाणी वापराचे प्रमाण जे प्राधिकरणाने ठरवले आहेत, ते गावावर तरंगत्या जनसंख्येच्या दाबामुळे पडणाऱ्या ताणाचा विचार करुन घरगुती पाण्याचा वापराचे प्रमाण शिथिल करुन १३५ ली. द.व्य/प्र. दि. या दराने पाणी पुरवठा करावा ज्या करता योजनेचे नियोजन केले आहे; व त्या व्दारे श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, व शिरडी न. प. व कोपरगाव न. पा. क्षेत्राला पाणी मिळणार आहे.

२. प्राधिकरणाने, प्रकरणाचे गांभिर्य व निकड, तरंगत्या जनसंख्येच्या आणि अंतिमता जो दाब पाणी पुरवठयावर पडु शकतो, जसे याचिकाकर्त्यांने त्वरित प्रतिवेदनाचे स्वरुपात केले आहे, ते लक्षात घेऊन स्वाधिकारे याची दखल घेऊन तसेच प्रकरणात येत असलेल्या अडचणीला सामोरे जाण्यासाठी, मजनिप्रा कामकाज नियमन २०१३ अन्वये नियमन ११ ने प्रदान केलेल्या शक्तीव्दारे, तसेच वाचा मजनिप्रा निकषाचा दि. २२/०९/२०१७ चा आदेश जो खंड क्र. १२ च्या अंतर्गत; व्यापक जनहित लक्षात घेऊन, प्रतिवादींना नोटीस निर्गमित केलेत.

३. याचिकाकर्त्यांनी केलेल्या याचिकेत जे मुद्दे मांडण्यात आले आहेत, त्याचा आशय खाली दिला आहे.

१. त्यांचा मुद्दा होता की, राज्य शासनाने विधी व न्याय विभागामार्फत निलवंडे धरणातुन मिळणाऱ्या पाण्याचा उपसा करून शिरडी संस्थानला जास्तीचा पुरवठा होण्यासाठी प्रशासनीक मान्यता शासन निर्णय दि. ०१/०९/२०१७ अन्वये दिली आहे.

२. श्री. साईनाथ शिरडी संस्थान हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे देवस्थान असल्यामुळे सणासुदीला व एरवी देखील हजारो भाविक येथे एकत्र होतात. शिरडी लहान नगरपंचायत असल्यामुळे एवढया भाविकांची येथे राहण्याची व्यवस्था होत नाही. त्यामुळे ते काही तरी हंगामी व्यवस्था करतात किंवा जवळच्या कोपरगावला राहतात. यामुळे स्थानिक प्रशासनाला पाणी पुरवठा उपलब्ध करण्यासाठी तसेच इतर सोयी पुरवतांना बराच त्रास होतो.

३. घरगुती पाण्याची मागणी पुर्ण करण्यासाठी, शासनाने प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेला प्रशासनिक मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना डीपीआर तयार करण्याचे काम सोपवले तथा श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, शिरडी न. पंचायत व कोपरगाव साठी त्यांची पाण्याची मागणी, जेंव्हा जास्त गर्दी असते. विचारात घेऊन, त्या योजनेला तांत्रिक संमंत्रणा देण्याची जबाबदारी सोपवली.

४. नंतर, राज्य शासनाच्या वि. व न्या. विभागाने शा. नि. दि. ०७/०२/२०१८ व्दारे पाणी पुरवठा योजनेमधे बदल करुन त्याची व्याप्ति, शिरडी न. पं. व कोपरगाव न. पा. ची पाण्याची मागणी, तसेच सध्याची व सनासुदीला वाढलेली जनसंख्या विचारात घेऊन, वाढवली. या शा. निर्णयात दुसऱ्या अटींबरोबर, आवश्यक ती प्रमाणपत्रे, जसे पाण्याचा स्त्रोत, पाण्याची उपलब्धता, पाण्याची प्रतवारी इत्यादी मिळवल्या खेरीज कामाचे आदेश (वर्क ऑर्डर) देता येणार नाही, असे म्हटले आहे.

५. निलवंडे प्रकल्पाचा स्त्रोत निश्चित करुन, तेथून कार्यक्षमतेने पाईपलाईन मधुन पाण्याचे वहन करावे याचा विचार करुन प्रस्तावित एकत्रित पाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले आहे. सध्या

या स्थानिक संस्थांना दारणा प्रकल्पाच्या कालव्या व्दारे पाणी मिळते. दारणा धरण प्रकल्पाच्या घरगुती पाणी आरक्षणात वाढ होवून ते ४५% झाल्यामुळे अत्यंत तणावाखाली ते पाण्याची गरज पुर्ण करीत आहे. त्यामुळे या योजनेचे तांत्रिक संमंत्रक यानी विचारपुर्वक निलवंडे प्रकल्पाचे पाणी वापरावयाचे ठरविले आहे.

६. प्राधिकरणाने दि. २२/०९/२०१८ ला निश्चित केलेल्या निकषांमधे हंगामी / तरंगत्या जनसंख्येचा तसेच हॉटेल्स, शाळा व महाविद्यालये ई. चा विचार करुन पाणी वापराचे प्रमाण ठरविले नाही. केंद्रीय जनस्वास्थ व पर्यावरण अभियांत्रिकी संस्थेने प्रकाशित केलेल्या माहितीमधे १३५ ली प्र. व्य./प्र दि. चा उल्लेख केला आहे. त्याप्रमाणे वर दिलेल्या ३ एकत्रित झालेले एककांसाठी निलवंडे प्रकल्पाच्या स्त्रोतामधुन १६.६४ दलघमी पाण्याची मागणी असल्याचे दिसुन आले आहे.

७. म्हणून, प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करुन प्रार्थना केली आहे की, त्यांनी दि. २२/०९/२०१८ च्या आदेशानुसार निश्चित केलेले घरगुती पाणी वापराचे प्रमाण शिथील करावे.

४. प्राधिकरणाने याचिकाकर्त्याच्या याचिकेचा विचार करुन याचिकाकर्ते व प्रतिवादी क्र. १ ते ४ कडुन सर्व संबंधित माहिती, तपशील सर्व दस्तावेज व अभिलेखांसह मागविली. प्राधिकरणाने पुढची सुनावणी २८/०९/२०१८ ला दुपारी १२.०० वाजता ठरवली.

## सत्यस्थिति

५. याचिकाकर्ते – श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्या मार्फत, त्याच्या दि. ०३/०९/२०१८ च्या प्रतिवेदनानुसार या प्राधिकरणाला विनंती केली आहे की, पाणी वापराचे प्रमाण जे प्राधिकरणाने ठरवले आहेत, ते गावावर तरंगत्या/अस्थायी जनसंख्येच्या दाबामुळे पडणाऱ्या ताणाचा विचार करुन घरगुती पाण्याचा वापराचे प्रमाण शिथिल करावेत. राज्य शासनाने कथित शासन निर्णयाप्रमाणे वर दिलेल्या ३ एकत्रित योजनांना रु. २६०.३८ करोडची

प्रशासनिक मान्यता दिली आहे; ज्याचा खर्च याचिकाकर्ते श्री. साईबाबा संस्थान शिरडी, शिरडी न प. व कोपरगाव न. पा. करणार आहे. या योजनेसाठी निलवंडे प्रकल्पाचा स्त्रोत विचारात घेतला आहे. या योजनेचा डीपीआर म.ज.नि.प्रा. ने निलवंडे प्रकल्पाचा स्त्रोत विचारात घेऊन तयार केला आहे.

६. राज्य शासनाने निलवंडे प्रकल्पाचा स्त्रोत म्हणुन विचार करुन या योजनेला शा. नि. दि. ०१/०९/२०१७ अन्वये १९१.९१ करोड रु. ची या योजनेला प्रशासनिक मान्यता दिली होती. राज्य शासनाने नंतर या पाणी पुरवठा योजनेमधे बदल करुन त्याची व्याप्ति, शिरडी न. पं. व कोपरगाव न. पा. ची पाण्याची मागणी, तसेच सध्याची व सनासुदीला वाढलेली जनसंख्या विचारात घेऊन वाढवीली, तसेच या स्थानिक संस्थांवर पडणारा वाढता ताण लक्षात घेवून, नवीन शासन निर्णय दि. ०७/०२/२०१८ काढुन, त्या अन्वये एकत्रित पाणी पुरवठा योजनांसाठी प्रशासनिक मान्यता दिली.

७. श्री. साईबाबा संस्थान शिरडी च्या ट्रस्टने जे शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या अंतर्गत काम करते, त्याच्या व्यवस्थापन समितिने या संपुर्ण एकत्रित पाणी पुरवठा योजनांचा खर्च देण्याचे मान्य केले आहे. या व्यवस्थापन समितिने रीट अर्ज क्र. १२३४६/२०१४ अनुसार मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद पीठासमोर दाखल करुन या योजनेसाठी खर्च करण्याची परवानगी मागितली आहे.
मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दि. १५/०७/२०१६ च्या आदेशान्वये ४ आठवडयाचे आत तांत्रिक मंजुरी प्रदान करण्याचे व पुढल्या २ आठवडयात प्रशासनिक मान्यता देण्याचे निर्देश दिले. त्याप्रमाणे आवश्यक ती मंजुरी या योजनेला दिल्याचे दिसुन आले आहे.

८. म.जि.प्रा. क्षेत्रीय विभाग नाशिक हे या योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन संमत्रक आहेत. त्यांनी योजनेचे नकाशे, आराखडे व मुल्यांकन तयार केले. श्री. साईबाबा संस्थान, शिरडी, शिरीडी न. पा. व

कोपरगाव न. पा. हे मात्र या लाभक्षेत्रात बाहेर असुन सध्या दारणा धरणाच्या उघडया कालव्यातुन त्यांना पाणी पुरवठा होत आहे.

९. विचारात असलेल्या प्रकरणाच्या पेयजलाच्या डी.पी.आर. मधे केलेल्या तरतूदीप्रमाणे वार्षिक गरज श्री. साईबाबा संस्थान शिरडी, शिरडी नं. पंचायत व कोपरगाव न. पा. साठी अनुक्रमे ९.०१, ३.८९ व ४.९२ दलघमी म्हणजे एकुण १७.८२ दलघमी आहे.

१०.अशाप्रकारे, आधीचे मंजुर आरक्षण १३.१५ दलघमी सहित, एकुण पाणी आरक्षण निलवंडे धरणातुन ३०.९७ दलघमी म्हणजे ९.५% आहे.

११.प्रतिवादी क्र. ४ च्या अहवालावरुन जोडपत्र ४, जे याचिकाकर्त्यांच्या याचिकेला जोडले आहे, असे दिसते की, योजनेसाठी त्याच्या रचनेमध्ये, शिखर काळामधील जी पाण्याची गरज विचारात घेतली आहे ती अस्थायी / तरंगती लोकसंख्या ध्यानात घेऊन केली आहे.

१२. ज. सं. वि. च्या प्रतिनिधीने सुनावणी दरम्यान जी माहिती दिली आहे, त्यानुसार दारणा धरणातुन मंजुर पाणी आरक्षण ४५% आहे जे पेयजलाच्या बरेच जास्त आहे तर हे खरे आहे की दारणा धरणाचे पेयजलाचे आरक्षण क्षेत्रीय वाटप १५% पेक्षा जास्त असल्यामुळे यंत्रणेवर त्याचा दाब पडला आहे.

**प्राधिकरणासमोर झालेली सुनावणी (कार्यवृत्त)**

१३.प्राधिकरणाने दि. २८/०९/२०१८ ला सुनावणी घेतली ज्यात सर्व पक्षांना बाजु मांडण्यासाठी पुरेपुर संधी देण्यात आली. सुनावणीला खालील व्यक्ति हजर होत्या.

१. श्रीमती. रुबल अग्रवाल (आयएएस) – याचिकाकर्त्या

२. श्री. एन. बी. कुळकर्णी – कार्यकारी अभियंता, मजनिप्रा संगमनेर–प्रतिवादी क्र. १ करिता

३. श्रीमती. संगिता जगताप – कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा विभाग, संगमनेर–प्रतिवादी क्र. २ करीता

४. श्री. पी. एल. गुजर – कनिष्ठ अभियंता, शिरडी न. पं. – प्रतिवादी क्र. ३ करिता

५. श्री. एस. पी. नोरोडे– कनिष्ठ अभियंता, कोपरगाव, न. पा. – प्रतिवादी क्र. ४ करिता

६. श्री. मिलींद भांगरे – सहायक अभियंता, मजीप्रा, कोपरगाव उपविभाग–प्रतिवादी क्र. १ करिता

७. ॲड. सिध्दार्थ कर्पे – हस्तक्षेपकांचे ॲडव्होकेट

८. ॲड. आर. पी. पुलाते – हस्तक्षेपका करिता

१४.सुनावणीच्या वेळी हस्तक्षेप करण्याकरिता श्री. ज्ञानेश्वर घोरपडे यांनी ॲड. सिध्दार्थ कर्पे मार्फत ग्रामपंचायत पिंप्री निर्मल ता. राहाता, जि. अहमदनगर साठी व करिता अर्ज केला. प्राधिकरणाने पाहिले की हस्तक्षेपकाचा अर्ज, प्राधिकरणाने हे प्रकरण स्वाधिकारे घेतल्यामुळे व खंड १२, प्राधिकरणाच्या निकषाच्या २२/०९/२०१७ च्या आदेशाप्रमाणे, दाखल करुन घेण्यायोग्य नाही आहे. ज्याअर्थी हस्तक्षेपकाला किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला बाधक ठरणार नाही म्हणुन प्राधिकरणाने विचारांती ठरवले की, हस्तक्षेपक अर्ज स्वीकारणे शक्य नाही, व त्याप्रमाणे त्या अर्जाची दखल न घेता तो निकालात काढला. आणखी सांगायचे म्हणजे, कथित हस्तक्षेपकाने एक वेगळी याचिका प्र. क्र. ७/२०१८ मधे दाखल केली होती व त्याची सुनावणी प्राधिकरणाने केली होती. प्र. क्र. ७/२०१८ मधे वर्णिलेली व्यथा व हा हस्तक्षेपक अर्ज सारखाच आहे. या प्राधिकरणाने प्र. क्र. ७/२०१८ ची या याचिकाकर्त्याच्या याचिकेची सुनावणी केली होती व त्यावर दि. १५/१०/२०१८ चा आदेश जारी केला होता.

१५.प्राधिकरणाच्या निर्देशाप्रमाणे, याचिकाकर्त्यांनी श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी, शिरडी न. पंचायत व कोपरगाव साठी च्या एकत्रित प्रकल्पासाठी डी. पी. आर. इतर माहितीसोबत दि. २७/०९/२०१८ च्या पत्राने सादर केला.

१६.प्रकरणात उद्‌भवणारे मुद्दे समजुन घेण्यासाठी, प्राधिकरणाने सुनावणी दरम्यान कांही प्रश्न याचिकाकर्ते व प्रतिवादींसमोर उभे केलेत आणि सर्व संबंधितांना निर्देश दिलेत की, त्यांनी नोटराईज्ड शपथपत्र या प्रश्नांवर दाखल करावे.

**याचिकाकर्त्यांसाठी प्रश्न—**

१. सध्याची व तरंगती (अस्थायी) जनसंख्या किती आहे?

२. शिरडी संस्थानांसाठी ५.०७२ दलघमी पाण्याचा जो अंदाज व्यक्त केला आहे, त्याचा आधार काय आहे?

**प्रतिवादी क्र. १ साठी प्रश्न —**

१. १३५ ली. प्र. व्य./प्र. दि. चे प्रमाण ठरवण्याचा आधार काय आहे?

२. प्राधिकरणाने घाऊक घरगुती पाणी पुरवठयासाठी निश्चित केलेला व २२ सप्टे. २०१७ ला जारी केलेल्या निकषाची आपल्याला माहिती आहे काय?

३. ते म.ज.नि.प्रा. ला लागु नाही काय?

४. सी. पी. एच. इ इ ओ (कें. ज. स्वा. प. अ.) चे प्रमाण हे डिजाईन करावयाचे आहे की पाणी पुरवठयाकरिता आहे.

५. पुरवठयाच्या बाजुने उभ्या राहणाऱ्या अडचणी, समस्या सी.पी.एच.इ.इ.ओ ने विचारात घेतल्या आहेत काय?

६. सी. पी. एच. इ. इ. ओ ने विशिष्ट खोऱ्यासाठी पाण्याची उपलब्धतता विचारात घेतली आहे काय?

**प्रतिवादी क्र. २ साठी प्रश्न–**

१. याचिकाकर्त्यासाठी त्यांनी प्रार्थना केल्याप्रमाणे पाण्याचे प्रमाण शिथिल केल्यामुळे त्याचा पाणी नियोजनावर काय परिणाम होईल?

**प्रतिवादी क्र. ३ साठी प्रश्न–**

१. शिरडी नगर पंचायतची सध्याची व तरंगती (अस्थायी) जनसंख्या किती आहे?

२. शिरडी नगर पंचायत साठी ५.१७३ दलघमी पाण्याचा जो अंदाज व्यक्त केला आहे, त्याचा आधार काय आहे?

**प्रतिवादी क्र. ४ साठी प्रश्न–**

१. कोपरगाव नगर परिषद ची सध्याची व तरंगती (अस्थायी) जनसंख्या किती आहे?

२. कोपरगाव नगर परिषदची ६.३९५ दलघमी पाण्याचा जो अंदाज व्यक्त केला आहे, त्याचा आधार काय आहे?

१७. प्राधिकरणाच्या निर्देशाप्रमाणे याचिकाकर्ते तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ नी सर्व संबंधित सखोल माहिती व व्यक्त केलेल्या अंदाजाचे गणित शपथपत्रात सादर केले. तथापि, प्रतिवादी क्र. १ व २ हे कोणतीही माहिती, प्राधिकरणाचे निर्देश असुनही, देवू शकले नाही. प्राधिकरणाने वरीलप्रमाणे याचिकाकर्ते व प्रतिवादी क्र. ३ व ४ कडून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करुन, याचिकाकर्त्याचे याचिकेवर निर्णय घेण्यासाठी, प्रतिवादी क्र. १ व २ यांना कांही जास्तीची माहिती प्रकरणात द्यावयाची नाही असे गृहित धरुन, प्रकरणातील मुद्यांबद्दल, व्यापक जनहित लक्षात घेऊन, कामकाज सुरु ठेवले.

**१८.सध्याच्या अधिनियमांत, नीती व शासन निर्णयामधे पेयजल पुरवठया विषयी असलेल्या महत्वाच्या संबंधित तरतूदी.**

मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम ११ (अ) अंतर्गत मजनिप्रा ला नदीखोरे अभिकरणांनी जे पाण्याचे हक्क दिले आहेत त्यात पाण्याच्या वितरणाचे निकष निश्चित करण्याची जबाबदारी दिली आहे. त्याप्रमाणे प्राधिकरणाने नदीखोरे अभिकरणांना जे पृष्ठीय पाण्याचे हक्क दिले आहेत त्या पाण्याच्या घरगुती व औद्योगिक वापरासाठी, प्राधिकरणाने वितरणाचे निकष दि. २२ सप्टे. २०१७ ला निश्चित केले आहेत. निकषांची संबंधित तरतुद खाली दिली आहे.

## ६. घरगुती पाणी वापराचे निकष :—

६.१ डी. घाऊक पाणी वापर कर्त्याचे हक्काचे प्रतिव्यक्ती प्रमाण जे लागु केले आहे, ते खाली दिले आहे.

तक्ता क्र. १

| अ. क्र. | प्रवर्ग | प्रमाण (ली. प्र. व्य./प्र. दि.) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ५५ |
| २ | शहरानिकटचे क्षेत्र | ७०* |
| ३ | नगरपरिषद | |
| | ३ (अ) — क — वर्ग | ७०* |
| | ३ (ब) — ब — वर्ग | १००* |
| | ३ (क) — अ — वर्ग | १२५* |
| ४ | महानगरपालिका (लोकसंख्या ५० लाख पेक्षा कमी) | १३५* |
| ५ | महानगर केंद्र ( ५० लाख किंवा जास्त लोकसंख्या ) | १५०* |

नोट क्र. १:— नागरी लोकसंख्या (प्र. २ ते ५) जेथे पाण्याचा पुरवठा सार्वजनिक पध्दतीने होतो तेथे पाण्याचे प्रमाण या लोकसंख्या समुहासाठी ५५ ली. प्र. व्य. प्र. दि. एवढा मर्यादित केला आहे; आणि जेथे बंद पाईपने पाणी पुरविल्या जाते, पण घाणपाणी विस्ताराच्या यंत्रणेशिवाय, तेथील प्रमाण ७० ली. प्र. व्य. प्र. दि. ठेवले आहे.

नोट क्र. २ :— जे प्रमाण स्तंभ ३ मधे दर्शविले आहे ते महत्तम पाणी पुरवठयाचे प्रमाण आहे. क्र. २ ते ५ मधील (डी) घाउक पाणी वापरकर्ते संयुक्तिक पाणी वापर करुन ते पावसाचे पाणी साठवून व त्याचा पुनर्वापर करुन आपली ताज्या पाण्याची मागणी कमी करण्याचा प्रयत्न करतील.

नोट क्र. ३ :— हे प्रमाण यु एफ डब्ल्यु वगळुन आहे. पहिल्या वर्षी पाण्याचा हक्क १५% पर्यंत मर्यादित युएफडब्ल्यु धरुन राहील जो विहित प्रमाण लक्षात घेवून ठरवला आहे. त्यानंतर युएफडब्ल्यु ची मर्यादा दरवर्षी १% (दुसऱ्या व तिसऱ्या) या नियंत्रण अवधी मधे कमी होईल.

नोट क्र. ४ :— हे प्रमाण ठरवतांना व्यापारिक, संस्थात्मक व लहान औद्योगिक गरजा लक्षात घेतलेल्या आहेत. तथापि, बील तयार करतांना नदीखोरे अभिकरण घरघुती घाऊक पाणी वापरासाठी स्वतंत्रपणे अशा पाणी वापराच्या भागाकरिता लागु होणाऱ्या दराप्रमाणे बीलाची आकारणी करतील.

६.२ पाणी हक्काचे वितरण नदीखोरे अभिकरण खाली दिलेल्या अटींचे पालन करतील.

(१) हे हक्क जलाशयातुन दिले जातील. घाऊक पाणी वापरकर्ते जलाशयापासून जलशुध्दीकरण संयत्रापर्यंत वहन हानी कमी होण्यासाठी बंद पाईप लाईन टाकतील.

(७) नगरपरिषद, महानगरपालिका व महानगराला एखादा नवीन हक्क तेंव्हाच दिला जाईल जेंव्हा घाउक वापर कर्त्याजवळ सांडपाणी शुध्दीकरण संयंत्राच्या बांधकामाची पाणी पुरवठयाबरोबरच समवर्ती योजना असेल.

**१९. पाणी पुरवठा व शुध्दीकरण मॅन्युअल (पुस्तिकेत) मधे असलेल्या संबंधित तरतुदी**

नगरविकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मे, १९९९ मधे पाणी पुरवठा व शुध्दीकरण मॅन्युअल प्रकाशित केले आहे. या पुस्तिकेत प्रति व्यक्ती पाणी पुरवठयाचे आकडे, पाणी पुरवठा योजना तयार करण्यासाठी दिले आहे ते खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नगराचे/शहराचे वर्गीकरण | शिफारस केलेली पाणी पुरवठयाची कमाल मात्रा (लीप्रव्य/प्रदि) |
|---|---|---|
| १. | ज्या शहरात, सांडपाण्याची यंत्रणा आहे/ किंवा त्याचा विचार सुरु केला आहे; बंद पाईप ने पाणी पुरवठा होतो | १३५ |

**२०. तरंगत्या (अस्थायी) लोकसंख्येसाठी तांत्रिक मार्गदर्शक तत्वे :–**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा ने दि. १८/१२/२०१५ च्या पत्रान्वये खालील दिलेले प्रमाण, तरंगत्या लोकसंख्ये साठी दिले आहे :–

७ (ब) तरंगती लोकसंख्या मुख्य अधिकारी/उप आयुक्त प्रमाणित करतील. तथापि, पाणी पुरवठयाचे पाण्याचे प्रमाण असे राहील:–

१) स्नानगृहांची तरतूद केली आहे : ४५ ली. प्र.व्य.प्र.दि.

२) स्नानगृहांची सोय नाही : २५ ली.प्र.व्य.प्र दि.

२१. याकिचाकर्त्यांनी त्यांच्या प्रतिवेदनात ज्या त्रासाची, अडचणीची माहिती दिली आहे, त्याचा विचार करता प्राधिकरणाच्या लक्षात आले की तरंगत्या लोकसंख्येचा परिणामाचा विचार करुन प्रमाण ठरविणे योग्य राहील व त्याबरोबर यासाठी किती पाणी लागु शकेल याची निश्चिती करावी लागेल. त्याप्रमाणे खाली दिल्याप्रमाणे मुद्यांचे सांचे तयार केलेत :

२२. अभिलेखा मधे आलेली माहिती व आंकडेवारी तसेच विविध पक्षांनी दिलेल्या शपथपत्रात जी माहिती दिली आहे. त्यावरुन असे दिसून आले की शिरडी देवस्थान व शिरडी नगर पंचायत मधे सांडपाणी विल्हेवाटीचे संयंत्र बसविले आहे. परंतु कोपरगाव न. पा. मधे ही सोय उपलब्ध नाही. आणखी सांगायचे म्हणजे त्यांना पाणी पुरवठा उघडया कालव्याव्दारे होतो. (बंद पाईप मधुन नाही) संकल्पित व तंरगती लोकसंख्या जी एकत्रित पाणी पुरवठा योजनेसाठी डी. पी. आर साठी गरजेची आहे व जी प्रतिवादी क्र. ३ व ४ ने दाखल केली आहे, त्याचा ज. सं. वि. व नदीखोरे अभिकरणाने पाण्याचा हक्क ठरवण्याससाठी व पाण्याचा हिस्सा निश्चित करण्यासाठी वापर करणे गरजेचे आहे, त्याचप्रमाणे प्राधिकरणाने निकषाचा आदेश दि. २२/०९/२०१७ च्या पत्रान्वये दिला आहे, किंवा जो वेळोवेळी निश्चित केला जाईल, हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे.

**२३. मुद्दे सांचेबध्द करणे :—**

प्राधिकरणाने प्रकरण समजुन घेतल्यावर व (पार्टींनी) पक्षांनी मांडलेले मुद्दे लक्षात घेऊन, दिलेले दस्तावेज व माहितीचा विचार केल्यावर, खाली दिल्याप्रमाणे मुद्दे उद्‌भवलेले आहे.

अ) घरगुती पाण्याचा पुरवठा करण्याकरिता तरंगत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन त्याचे प्रमाण ठरवणे व पक्के करणे आवश्यक आहे काय?

ब) याचिकाकर्त्यांने मागणी केल्याप्रमाणे जे प्रमाण २२ सप्टे. २०१७ च्या आदेशाने ठरविले आहेत, काय ते शिथिल करणे गरजेचे आहे?

क) कायमस्वरुपी तसेच तंरगत्या लोकसंख्येचा शिखर बिंदू लक्षात घेवून पाणी योजनेची रचना करणे गरजेचे आहे?

**प्राधिकरणाचे निष्कर्ष**

**२४. प्राधिकरणाने वरील मुद्यांवरील निष्कर्ष खाली दिले आहेत.**

**अ) घरगुती पाण्याचा पुरवठा करण्याकरिता तरंगत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन त्याचे प्रमाण ठरवणे व पक्के करणे आवश्यक आहे काय?**

जे २२/०९/२०१७ चे निकषाचे आदेश काढले आहेत त्यात तरंगत्या/अस्थायी लोकसंख्येची पाण्याची मागणी पुर्ण करण्याची काही तरतूद नाही. प्राधिकरणाचे असे मत आहे की तरंगत्या/अस्थायी लोकसंख्येची पाण्याची मागणी पुर्ण करण्यासाठी दर्जेदार प्रमाण निश्चित करणे गरजेचे आहे. अशारितीने या प्रश्नाचे उत्तर होकारात्मक आहे.

आता, तरंगत्या लोकसंख्येच्या पाण्याची मागणी साठी दर्जेदार प्रमाण ठरविण्यासाठी प्राधिकरणाला वाटते की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा ने जे प्रमाणे निश्चित केले आहेत व परिच्छेद २० मधे ज्याचा उल्लेख केला आहे ते निवासी तथा अनिवासी तरंगत्या लोकसंख्ये साठी लागु करता येतील.

**ब) याचिकाकर्त्यांने मागणी केल्याप्रमाणे जे प्रमाण २२ सप्टे. २०१७ च्या आदेशाने ठरविले आहेत, काय ते शिथिल करणे गरजेचे आहे?**

शिरडी संस्थान व शिरडी नगर पंचायत या दोन्ही ठिकाणी बंद पाईप ने वितरण व्यवस्था तसेच बंद पाईप व्दारे सांडपाण्याचे निस्सारण व प्रक्रिया संयंत्र यंत्रणा, १६ दशलक्ष लीटर प्रतिदिन ची कार्यरत आहे. तथापि, कोपरगाव न. पा. मधे बंद पाईप (नळाने) ने पाण्याचे वितरण होते पण त्यांचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र नाही. म्हणुन प्राधिकरणाचे विचारांती असे मत आहे की, शिरडी संस्थान व शिरडी नगर पंचायत या दोन्ही ठिकाणी पाणी पुरवठयाचे प्रमाण शिथिल करुन १३५ ली.प्र.व्य.प्र.दि. करता येईल. परंतु त्यासाठी जेव्हढे सांडपाणी त्याचेकडे निर्मित होते त्या सर्व सांडपाण्यावर त्यांनी प्रक्रिया करावी, व त्यायोगे त्याचा जेवढा जास्त होईल तेवढा पुनर्वापर करावा आणि उरलेले प्रक्रिया केलेले पाणी सिंचनाला उपलब्ध करावे, अशी अट संयुक्तिक राहील.

**क) कायमस्वरुपी तसेच तरंगत्या लोकसंख्येचा शिखर बिंदू लक्षात घेवून पाणी योजनेची रचना करणे गरजेचे आहे?**

या प्राधिकरणाचे असे मत आहे की, अशा पाणी पुरवठा योजनेची रचना करण्यासाठी जे रेखांकन करावयाचे आहे त्यावर या ठिकाणी जमणाऱ्या पुष्कळ तरंगत्या लोक संख्येचा होणारा मोठा परिणाम लक्षात घ्यावा लागेल. त्यासाठी अशा योजनेच्या डीपीआर शी संलग्नित असणाऱ्या तांत्रिक संमंत्रकाला तरंगत्या लोकसंख्येचा शिखर बिंदू व त्याचा परिणाम लक्षात घ्यावा लागेल. तसेच भविष्यात पुढल्या ३० वर्षात वाढु शकणाऱ्या पाण्याच्या मागणीचा विचार करावा लागेल. तथापि, पाण्याच्या आरक्षणाचे व हक्काचे मुल्यांकन करण्यासाठी नदीखोरे अभिकरणाने सरासरी वार्षिक तरंगती लोकसंख्या व त्या ठिकाणची स्थायी लोकसंख्या विचारात घ्यावी. अशारितीने या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी येते.

२५. अंतिम आदेश/निर्देश

या वादात दोन्ही पक्षांचे मत ऐकूण घेतल्यावर, समोर आलेल्या कागदपत्रांचा तसेच अभिलेखावर असलेल्या माहितीचा व त्यांनी जे सादरीकरण केले, तसेच वरील मुद्यांवर उत्तर दिल्यावर, प्राधिकरण खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

अ) तरंगत्या लोकसंख्येच्या पाण्याचे प्रमाण खालील प्रमाणे राहील.

१) स्नानगृहांची तरतूद केली आहे : ४५ ली.प्र.व्य.प्र.दि.

२) स्नानगृहांची सोय नाही : २५ ली.प्र.व्य.प्र.दि.

नोट १:– तरंगती लोकसंख्या मुख्य अधिकारी/उपायुक्त प्रमाणित करतील.

नोट २ :– जेथे स्नानगृहाची सोय आहे किंवा नाही आहे अशी विभागणी केलेली नाही, तेथे सरासरी प्रमाण ३५ ली.प्र.व्य.प्र.दि. स्विकारले जाईल.

ब) शिरडी संस्थान व शिरडी न. पंचायत या दोन्ही ठिकाणी बंद पाईप ने वितरण व्यवस्था तसेच बंद पाईप व्दारे सांडपाण्याचे निस्सारण व प्रक्रिया संयंत्र यंत्रणा, १६ दशलक्ष लीटर प्रतिदिन ची कार्यरत आहे. शिरडी संस्थान व शिरडी नगर पंचायत साठी पाण्याची उपलब्धतेचे प्रमाण शिथिल करुन १३५ ली प्र.व्य.प्र.दि. केले आहे. परंतु त्यासाठी जेव्हढे सांडपाणी त्याचेकडे निर्मित होते त्या सर्व सांडपाण्यावर त्यांनी प्रक्रिया करावी, व त्यायोगे त्याचा जेवढा जास्त होईल तेवढा पुनर्वापर करावा आणि उरलेले प्रक्रिया केलेले पाणी सिंचनाला उपलब्ध करावे, अशी अट संयुक्तिक राहील. कोपरगाव न. पा. साठी पाणी पुरवठयाचे प्रमाण प्राधिकरणाने दि. २२/०९/२०१७ च्या आदेशात निश्चित केल्याप्रमाणे राहील.

क) प्रस्तावित संयुक्त पाणी पुरवठा योजना शिरडी देवस्थान, शिरडी नगर पंचायत व कोपरगाव न. पा. साठी तयार करावी व त्याला अंतिम रुप द्यावे; त्यासाठी जे प्रमाण तरंगत्या लोकसंख्येसाठी ठरवले आहे व निश्चित केले आहे, त्याचप्रमाणे स्थायी लोकसंख्ये आधीच निश्चित केलेले प्रमाण ज्यासाठी भविष्यातील ३० वर्षाची पाण्याची मागणी लक्षात घ्यावी व ठरवावे.

ड) नदीखोरे अभिकरण व त्याचे विहित प्राधिकारी, जल संपत्ती विभागाने पाण्याचे आरक्षण व हक्क ठरवतांना, ते स्थायी व तरंगती लोकसंख्या विचारात घेतील व या प्राधिकरणाने निश्चित केलेले प्रमाण, त्यांच्या दि. २२/०९/२०१७ च्या आदेशान्वये तथा (वाचा) या आदेशानुसार ज्यात तरंगत्या लोकसंख्येचे प्रमाण ठरवले आहे, त्याचे पुर्णपणे पालन करतील.

इ) जे प्रमाण आता तरंगत्या लोकसंख्येच्या प्रवर्गासाठी निश्चित केले आहेत, ते ध्यानात घेवून या प्राधिकरणाच्या सचिवालयाला, हे प्राधिकरण निर्देश देते की, त्यांनी त्याप्रमाणे २२ सप्टे. २०१७ च्या आदेशाची दुरुस्ती/पुरवणी तरंगत्या लोकसंख्येच्या संदर्भात निर्गमित करावी, सर्व संबंधीत याची नोंद घेतील.

याचिका याप्रमाणे निकालात काढली आहे.

यात खर्चाबद्दल काहीही निर्देश दिला नाही.

दि. १७/१०/२०१८ ला जारी केले.

| | |
|---|---|
| स्वा. | स्वा. |
| एस. टी. सांगळे | व्ही. एम. कुळकर्णी |
| सदस्य (इकॉनॉमिक्स) | सदस्य (ज. सं. अभियांत्रिकी) |

स्वा.

विनोद जे. तिवारी

अध्यक्ष व सदस्य, (विधि)